दैनिक
# महाराष्ट्र जीत

मुख्य सपादक सागर राणा अभोरे    सपादक बदूभाऊ इगोले

वाशीम ■ शनिवार दिनांक 17 मे 2025 ■ वर्ष : 1 ले ■ अंक : 353 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रुपये ■ Title code:- MAHMUL03935

# पुनर्विकासात विकासक निवडीतील निबंधकांचा भ्रष्टाचार थांबवा

## ‘मुंबई ग्राहक पंचायती’ने सुचवली गृहनिर्माण संस्था नियमावलीत दुरुस्ती

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** पुनर्विकासासाठी विकासकाची निवड करताना निबंधक आपल्या अधिकारांचा गैरवापर करत आहेत. हा भ्रष्टाचार रोखण्यासाठी निबंधकांच्या कार्यालयाकडून विशेष सर्वसाधारण सभेसाठी आवश्यक ती परवानगी मागण्याची पूर्वअटच रद्द करून निबंधक कार्यालयाचा यातील सहभाग संपूर्णपणे काढून टाकावा, अशी सूचना ‘मुंबई ग्राहक पंचायती’ने केली आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नियमात दुरुस्ती करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने सर्व संबंधितांकडून सूचना आणि हरकती मागवल्या आहेत. प्रस्तावित नियमांत काही दुरुस्त्या सुचवतानाच ‘मुंबई ग्राहक पंचायती’ने पुनर्विकासाबाबत नव्याने काही महत्त्वाच्या सूचना शासनाला केल्या असल्याचे कार्याध्यक्ष शिरीष देशपांडे यांनी सांगितले. विकासक निवडीत निबंधकांचा फार मोठ्या प्रमाणावरील भ्रष्टाचारी सहभाग त्वरित थांबवण्याची आग्रही मागणी त्यांनी केली आहे.



### मुंबई ग्राहक पंचायतीने केलेल्या सूचना

- ७९ ( अ)अंतर्गत जारी असलेल्या पुनर्विकास प्रक्रियेबाबतच्या सूचनांचा नियमांत अंतर्भाव करावा.
- विकासक निवडीसाठी किमान ५१ टक्क्यांची अट शिथिल करावी.
- कार्यकारिणी सभा ऑनलाइन घेण्याची तरतूद करावी.

### निबंधकांकडून अधिकाराचा गैरवापर

विकासक निवडीसाठी विशेष सर्वसाधारण सभा बोलावली जाते. विकासक निवड प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी निबंधक कार्यालयाने सभेत आपला एक प्रतिनिधी नेमणे बंधनकारक आहे. परंतु, निबंधकांच्या या अधिकाराचा फार मोठ्या प्रमाणावर गैरवापर होत असल्याचा आरोप होत आहे. विशेष सर्वसाधारण सभेची परवानगी आणि नंतरचे ‘ ना हरकत प्रमाणपत्र’ देण्यासाठी निबंधक कार्यालयाकडून प्रति सदनिका २५ ते ४० हजार रुपयांची मागणी करण्यात येते. विकासक मंडळीसुद्धा आपल्या धंद्याचाच हा एक भाग समजून अशा मोठमोठ्या रकमा बिनबोभाट निबंधकांच्या दलालांना देत असल्याचे गुपित राहिलेले नाही. हा भ्रष्टाचार थांबवण्यासाठी विकासक निवड प्रक्रियेत निबंधक प्रतिनिधीच्या उपस्थितीची अट रद्द करावी, अशी भूमिका ‘ मुंबई ग्राहक पंचायती’ने घेतली आहे.

# मनपाच्या निवडणुका २२७ प्रभागानुसार

## मुंबईतील प्रभाग रचनेचे काम लवकर पूर्ण करण्याच्या नगरविकास विभागाला सूचना

■ निवडणूक प्रक्रियेचे काम वेगात ■ मतदान केंद्रांच्या संख्येत वाढ

महाराष्ट्र जीत **मुंबई**

मुंबई महापालिकेच्या हद्दीत २२७ प्रभाग असून २२७ प्रभागानुसार मुंबई महापालिकेच्या निवडणुका पार पडणार आहेत. प्रभाग रचनेचे काम राज्य शासनाच्या माध्यमातून होत असल्याने महिनाभरात प्रभाग रचनेचे काम पूर्ण करा, अशी सूचना शासनाला करण्यात आली आहे. सदस्य संख्या निश्चित करणे, प्रभाग रचना, आरक्षण, मतदारयादी व प्रत्यक्ष निवडणूक अशा चार टप्प्यांत निवडणूक प्रक्रियेचे काम वेगात सुरू आहे.

मतदानाच्या ❮❯ संमिश्र पानावर

### चार टप्प्यांत निवडणूक कामे सुरू

१) सदस्य संख्या निश्चित करणे, प्रभाग रचना

२) आरक्षण

३) मतदारयादी

४) प्रत्यक्ष निवडणूक

### वॉर्ड आरक्षण लवकरच ठरणार

संख्या किंवा टक्केवारी निश्चित करणे, त्यानंतर कुठल्या वॉर्डात आरक्षण हे निश्चित होणार आहे.

### पुन्हा लॉटरी

२०१२, २०१७ व २०२२ मध्ये नेमके काय आरक्षण होते, यंदा कुठले आरक्षण असले पाहिजे त्यानुसार आरक्षण ठरणार आहे. त्यामुळे यंदाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पुन्हा लॉटरी काढण्यात येणार आहे.

### महानगरपालिका

- एकूण महानगरपालिका – २९ ( जालना व इचलकरंजी नवनिर्मित)
- प्रशासक असलेल्या महानगरपालिका – २९



### एकूण मतदार १० कोटी

विधानसभा निवडणुकीत किंवा अंतिम मतदारयादी प्रसिद्ध झाली, त्यानुसार १० कोटी मतदार निवडणुकीत मतदान करतील.

### नगरपरिषदा

- एकूण नगरपरिषदा – २४८
- एकूण नगरपंचायती – १४७
- प्रशासक असलेल्या व नवनिर्मित नगरपंचायती – ४२

# ‘आयएमएफ’च्या कर्जाचा पाक दहशतवादासाठी वापर करणार

## राजनाथ सिंह यांनी व्यक्त केली भीती

**भुज :** आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) पाकिस्तानला एक अब्ज डॉलरचे आर्थिक सहाय्य देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा ‘आयएमएफ’ने फेरविचार करावा, कारण या निधीचा वापर पाकिस्तान दहशतवादाला वित्तपुरवठा करण्यासाठी करू शकतो, अशी भीती संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी शुक्रवारी व्यक्त केली.

‘ऑपरेशन सिंदूर’दरम्यान भारतीय लष्कराने केलेल्या अतुलनीय कामगिरीचे कौतुक करण्यासाठी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह सध्या विविध लष्करी तळांना भेटी देत आहेत. गुरुवारी जम्मू-काश्मीरचा दौरा केल्यानंतर त्यांनी शुक्रवारी भुज येथील हवाई दलाच्या रूद्र माता तळाला भेट दिली. यावेळी त्यांनी ‘ ऑपरेशन सिंदूर’ संपले नसल्याचे आणि हा फक्त ट्रेलर होता, असे सांगून पाकिस्तानला इशारा दिला.

शांततेसाठी भारत हा नेहमीच आग्रही राहिला आहे. भारत जगात नम्रतेसाठी ओळखला जातो. पण जर कुणी आमच्या शांततेला नख लावण्याचा प्रयत्न केला तर त्याला आम्ही जशास तसे उत्तर देतो, हेही जगाने आता पाहिले, असेही राजनाथ सिंह म्हणाले.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला कर्ज देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयावर भारताने कडाडून टीका केली. राजनाथ सिंह म्हणाले की, या कर्जाच्या माध्यमातून पाकिस्तानच्या धरतीवरील दहशतवादाला खतपाणी घातले जाऊ शकते. त्यामुळे

❮❯ संमिश्र पानावर



### ...हा तर ट्रेलर, पिक्चर अद्याप बाकी आहे!

‘ऑपरेशन सिंदूर’ अद्याप संपलेले नाही, हा फक्त ट्रेलर होता, जेव्हा योग्य वेळ येईल, तेव्हा जगाला आम्ही संपूर्ण चित्रपट दाखवू. तसेच पाकिस्तानला भारताने ‘ प्रोबेशन पिरियड’वर ठेवले आहे. जर त्यांनी पुढील काळात आपली वर्तणूक सुधारली तर ठीक, नाहीतर त्यांना पुन्हा धडा शिकवला जाईल, असा इशारा संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी शुक्रवारी येथे दिला.



## संपादकीय

# सेल्फी हवीच, घरी न्यायला बाटलीभर काजवेही हवेत!

वळवाच्या पावसाचे वेध लागताच काजव्यांचा मिलन उत्सव सुरू होतो. जोडीदाराला आकर्षित करण्यासाठी नर काजवे लुकलुकत असतात. तसे पाहिले तर काजव्यांचे हे खासगी जीवन; मात्र माणसांना ते फार आकर्षित करते. याच आकर्षणापोटी अभयारण्याचे सर्व नियम पायदळी तुडवून शेकडो-हजारो माणसे मे-जूनमध्ये कळसूबाई-हरिश्चंद्रगड अभयारण्यात काजव्यांचा रोमँटिक सीन पाहण्यासाठी जातात. दरवर्षी साधारण ३० हजार पर्यटक येथे जातात. काही जण रात्री तंबूमध्ये तिथेच मुक्काम करतात. वाहनांची वर्दळ, चालण्या-बोलण्याचा गोंधळ, वाहनांचे हेडलाइट, मोबाइलच्या बॅटऱ्यांचा लख्ख प्रकाश, हॉर्न आणि कधीकधी संगीतदेखील. साधारण महिनाभर हा धिंगाणा चालतो. अभयारण्याच्या कुठल्या नियमावलीत हे बसते? 'काजवा महोत्सव वगैरे काही नसते' असा वनविभागाचा युक्तिवाद. 'या काळात म्हणजेच मे-जूनमध्ये जेवढे पर्यटक येतात त्यांना आम्ही गेटवर पावती घेऊन आत सोडतो. रात्री नऊनंतर प्रवेश दिला जात नाही', असे ते सांगतात. आत गेलेल्यांनी जास्तीत जास्त रात्री दहा वाजेपर्यंत बाहेर यावे, हा इथला नियम. स्थानिक गावकऱ्यांनी त्यांच्या जागेत तंबूची व्यवस्था केलेली असते. काही पर्यटक रात्रभर या तंबूत मुक्काम करतात. ही गावे आणि या गावकऱ्यांच्या मालकीची जागा हे तसे अभयारण्याचेच क्षेत्र. या महोत्सवातून स्थानिकांना रोजगार मिळतो; ही त्यातली सकारात्मक बाब. त्यांना तो मिळायलाच हवा; पण अभयारण्यात म्हणजे संरक्षित क्षेत्रात हे सारे घडते त्याचे दुःख. हीच बाब संगमनेरचा ३८ वर्षीय तरुण गणेश बोराडे याला खटकली. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणात त्याने यासंदर्भात याचिका दाखल केली आहे. नाशिक-पुणे महामार्गावर कंत्राटदाराला ३९ हजार झाडे लावायला भाग पाडणारा हाच तो गणेश. यासाठी त्याने पाच वर्षांची कोर्टवारी केली. कोरोनाकाळात गणेशनेही हा काजवा महोत्सव अनुभवला. 'दो गज की दूरी' असलेला तो काळ. तेव्हादेखील बाजार भरावा असा प्रसंग होता. अभयारण्यात जे काही टाळायला हवे ते सारे केले जात होते. त्यामुळेच गणेशने आता 'या महोत्सवाची नियमावली काय?' हा प्रश्न घेऊन न्यायाधिकरणात धाव घेतली आहे. भंडारदरा, पांजरे, उडदावणे, कोलटेंभे या आदिवासी खेड्यांच्या शिवारात, रंधा धबधब्याजवळ, भीमाशंकरचा काही भाग, ताम्हिणी अभयारण्य, पौड-मुळशी, लोणावळ्यातील राजमाची वनक्षेत्रात काजवा महोत्सवाचे आयोजन केले जाते. हौशी पर्यटक काजव्यांच्या लखलखाटाचा नैसर्गिक आनंद घेऊन थांबत नाहीत. त्यांना या काजव्यांसोबत सेल्फी हवी असते. ते बसलेल्या झाडांचा क्लोजअप हवा असतो. यासाठी पुरेसा प्रकाश नसेल तर वाहनांचे हेडलाइट, मोबाइलची बॅटरी हवी असते. हे काजवे बाटलीबंद करून घरी न्यायचे असतात. अभयारण्यातली शांतता दूरच, बाजारातला गोंगाट कमी वाटावा अशी स्थिती. या गोंगाटामुळे जंगलातील पक्षी, प्राणी, कीटकांचे काय होत असेल? त्यांचा अधिवास किती जणांच्या पायदळी तुडवला जात असेल? आपल्या घरात एखाद्या पाहुण्याने यावे आणि आपले रोजचे शेड्यूल आणि शांतता भंग करावी यातला हा प्रकार. जोडीदाराला आकर्षित करण्यासाठी लुकलुकणाऱ्या शेकडो काजव्यांनी झाडांना जणू दिव्यांची माळ घातली आहे, हे चित्र पाहायला कोणाला नाही आवडणार? पण, या आवडीची किंमत ती किती? आणि ती कोणी मोजायची? राखीव क्षेत्र म्हणजे अभयारण्याचे ठिकाण सोडून बाजूच्या गावांमध्ये काजवे दिसतात. प्रमाण कमी-जास्त असेल. त्या ठिकाणी असे महोत्सव का भरवले जात नाहीत? अभयारण्यात भरवायचे तर कडक नियम का नाहीत? वाहनांचे पार्किंग बाहेर का नाही? येणाऱ्यांच्या संख्येला मर्यादा का नाही? मोबाइल, कॅमेऱ्यावर बंदी का नाही? जंगल, त्यातील पक्षी, प्राणी, कीटक माणसाने पाहायलाच हवेत. समजून घ्यायलाच हवेत. तरच जंगल का वाचवायला हवे, हे समजेल. मात्र, या नावाखाली पर्यटकांचा हा धिंगाणा अभयारण्यात असाच सुरू राहिला तर उद्या काजव्यांचा लखलखाट पाहायला मिळणार नाहीच. अभयारण्य, त्यातील पक्षी, प्राणी आणि एकूणच जैवविविधता संपुष्टात येईल. अशा पर्यटनातून वनविभाग आणि स्थानिकांना चार पैसे मिळतात हे छानच. अशा पर्यटनाचे स्वागतही आहे; पण सोन्याची अंडी देणारी कोंबडी मारायला सोकावलेल्या बेबंद उत्साहाचे काय करावे?

# द्रोणागिरी स्पोर्टसच्या महादेव घरतांनी प्रकल्पग्रस्तांच्या मूलभूत प्रश्नांना हात घातला आहे.



महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधि**

द्रोणागिरी स्पोर्टस उरण यांनी उरणकरांना मैदान हवे , यासाठी आक्रमक आंदोलन छेडले आहे.या आंदोलनात कोमसाप कवींचा कवितांचा जागर घालून मैदानाच्या हक्काचे आवाजातून महादेव घरत यांनी मूलभूत प्रश्नांला जबरदस्त हात घातला आहे.त्यांना न्याय हे मिळणारच असेही नव्या मुंबईतील सुप्रसिद्ध कामगार नेते सुरेश ठाकूर यांनी भेंडखळ या गावी जाहीर सभेत विचार मांडले " उरणकरांना मैदान द्या,"या आंदोलनाचे, द्रोणागिरी स्पोर्टस उरणचे अध्यक्ष महादेव घरत यांनी बिगुल वाजविले असून तालुक्यातून उत्तम प्रतिसाद मिळाल्याचे माहितीसह स्पष्टिकरण आपल्या भाषणात केले. कवितांच्या जागरात " सिडकोला उलटा टांगणार "या कवितेने रायगडभूषण प्रा एल बी पाटील यांनी जागराची भूमिका मांडली आणि आगरी बोलीत पसायदान गाऊन सादर केले.अनिल भोईर,भरत पाटील, अक्षता गोसावी,प्रा.चंद्रकांत मढवी,न.ग.पाटील इत्यादी कवींनी अक्षरशः जागरात गोंधळ घातला. प्रांजळ भोईर यांनी सुरेख सूत्रसंचालन केले.प्रास्ताविक मच्छिंद्र घरत यांनी केले तर स्वागत किरण घरत यांनी केले. ग्रा.पं.सदस्या संगीता भगत यांनी आंदोलनास भेंडखळ ग्राम पंचायतीचा पाठिंबा जाहीर केला. यावेळी विजय ठाकूर, लखूशेठ ठाकूर, यशवंत ठाकूर प्रकाश घरत, गणेश घरत, भालचंद्र भगत, नासिकेत म्हात्रे, पांडुरंग पाटील, गणेश घरत,दीपक ठाकूर,रेखा घरत, मेघश्याम भगत, अशोक ठाकूर इत्यादी प्रमुख ग्रामस्थांची उपस्थिती होती. यावेळी परीक्षेत विशेष गुणांनी यश मिळविल्याने दिव्या भगत आणि रिवा घरत या विद्यार्थीनींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# चिरनेर महागणपतीचरणी नव विवाहित जोडप्यांची मांदियाळी

## संकष्टी चतुर्थीमुळे नागरिकांना मिळतोय दर महिन्याला रोजगार

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती क्षेत्रात संकष्टी चतुर्थी निमित्ताने काल शुक्रवारी गणेशभक्तांनी प्राचीन कलीन श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनाला सुरुवात झाली होती. यावेळी श्री महागणपतीच्या दर्शनासाठी नवविवाहित जोडप्यांनी आवर्जून हजेरी लावून, मनोभावे दर्शन घेतले. चिरनेर येथील गणपतीच्या मंदिराची निर्मिती पेशवे बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्या कारकिर्दीत झाली. नोव्हेंबर1758 ते फेब्रुवारी 1759 मध्ये नानासाहेब पेशवे स्वतः कोकणात फिरलेले दिसून येतात. वसईच्या विजयानंतर कोकणातील उरण व कर्नाळा प्रांताचा कारभार नानासाहेबांचे



सुभेदार रामजी पंत फडके यांनी चालविला. हा कारभार करताना त्यांनी अनेक ठिकाणी देवळे बांधली. तसेच देवळांचा जीर्णोद्धार केला. चिरनेर येथील गणपती मंदिर हे हेमाडपंथीय धाटणीचे दिसून येते. हे गणपती देवस्थान अत्यंत जागृत असून, या ठिकाणी आलेल्या भक्तांची दुःखे निश्चित दूर होतात. अशी गणेश भक्तांची श्रद्धा आहे. या श्रींच्या देवस्थानामुळे चिरनेर परिसरातील नागरिकांना दर महिन्याला रोजगार तर मिळाला. परंतु मुंबई, नवी मुंबईच्या व्यावसायिकांना देखील दर महिन्याच्या संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने व्यवसाय मिळाला असल्याची, माहिती येथील व्यावसायिकांनी दिली.


उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती क्षेत्रात संकष्टी चतुर्थी निमित्ताने काल शुक्रवारी गणेशभक्तांनी प्राचीन कलीन श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनाला सुरुवात झाली होती. यावेळी श्री महागणपतीच्या दर्शनासाठी नवविवाहित जोडप्यांनी आवर्जून हजेरी लावून, मनोभावे दर्शन घेतले.

चिरनेर येथील गणपतीच्या मंदिराची निर्मिती पेशवे बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्या कारकिर्दीत झाली. नोव्हेंबर1758 ते फेब्रुवारी 1759 मध्ये नानासाहेब पेशवे स्वतः कोकणात फिरलेले दिसून येतात. वसईच्या विजयानंतर कोकणातील उरण व कर्नाळा प्रांताचा कारभार नानासाहेबांचे सुभेदार रामजी पंत फडके यांनी चालविला. हा कारभार करताना त्यांनी अनेक ठिकाणी देवळे बांधली. तसेच देवळांचा जीर्णोद्धार केला. चिरनेर येथील गणपती मंदिर हे हेमाडपंथीय धाटणीचे दिसून येते. हे गणपती देवस्थान अत्यंत जागृत असून, या ठिकाणी आलेल्या भक्तांची दुःखे निश्चित दूर होतात. अशी गणेश भक्तांची श्रद्धा आहे. या श्रींच्या देवस्थानामुळे चिरनेर परिसरातील नागरिकांना दर महिन्याला रोजगार तर मिळाला. परंतु मुंबई, नवी मुंबईच्या व्यावसायिकांना देखील दर महिन्याच्या संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने व्यवसाय मिळाला असल्याची, माहिती येथील व्यावसायिकांनी दिली.


# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव'

## सनातन राष्ट्राचा जयघोष करत निफाड येथील 350 हिंदुत्वनिष्ठ गोव्याकडे रवाना





**विंचूर** :- मानवजातीच्या परमकल्याणासाठी, तसेच रामराज्याच्या स्थापनेसाठी कार्यरत सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष या निमित्ताने फोंडा-गोवा येथे १७ ते १९ मे या कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. फार्मागुडी, फोंडा येथील गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर हा महोत्सव होत आहे. या महोत्सवासाठी नाशिक या जिल्ह्यातून सनातन संस्थेचे शेकडो साधक, हिंदू धर्मप्रेमी आणि हिंदुत्वनिष्ठ यांनी 'सनातन राष्ट्रा'चा जयघोष करत हिंदुत्ववादी तसेच साधक असे एकूण 350 जणांनी बस मधून, वैयक्तिक वाहनाने, रेल्वेने व तसेच विमानाने गोव्याकडे प्रयाण केले. यावेळी हिंदुत्वनिष्ठांनी वाहनांवर लावलेल्या भगव्या ध्वजांमुळे वातावरणात चैतन्य पसरले होते. या प्रसंगी खेडे निफाड येथील हिंगलाज माता मंदिरांचे विश्वस्त रामदास त्र्यंबक कोल्हे तसेच विविध मंदिर विश्वस्तांचे प्रमुख यांची सन्मानिय उपस्थिती होती. या प्रसंगी मान्यवर यांनी इतर हिंदू बांधवांना या महोत्सव साठी उपस्थित राहण्याचे आवाहन सर्वांनी केले आहे.

# निवृत्तीनंतरही पाण्यात अभियंता विजय सवाई यांनी पाण्याच्या ताऱ्यांमधून हिरव्या भविष्याचा पाया रचला

## 'लाडेगाव जलतरचे रोल मॉडेल'



**वाशीम, बहीण. १६ मे (जिमाका)**

पाण्याच्या साठ्याच्या दृष्टिकोनातून गेल्या काही महिन्यांत लाडेगाव हे नाव अनेक वेळा चर्चेत आले आहे. परंतु यावेळी या गावाच्या प्रसिद्धीमागे एक निवृत्त अभियंता आणि त्यांचे निसर्गावरील प्रेम आहे. सिंचन विभागात अकोला येथील उपविभागीय अभियंता पदावरून निवृत्त झालेले विजय मोतीरामजी सवाई. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य पाणी व्यवस्थापनासारख्या महत्त्वाच्या विषयांवर घालवले आणि निवृत्तीनंतरही तेच काम पुढे नेण्याची जबाबदारी घेतली. आज विजय सवाई लाडेगावमधील १५ एकर शेतजमिनीवर स्वखर्चाने २० ते २२ जलवादळे तयार करत आहेत. हे काम केवळ भौतिकदृष्ट्याच नाही तर वैचारिकदृष्ट्याही उत्तम आहे. कारण या पुरांमुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढेल, शेतांना शाश्वत पाणीपुरवठा होईल आणि पावसाच्या पाण्याचा अप्रभावी अपव्यय टाळता येईल. सिंचन विभागात दीर्घ अनुभव असलेल्या सवाई यांना पाण्याचे महत्त्व केवळ कागदावरच नाही तर प्रत्यक्षातही आहे हे माहित आहे. म्हणूनच त्यांनी निवृत्तीनंतरही समाजासाठी काहीत

# कळंबोली येथे भव्य असे अंडरआर्म क्रिकेट स्पर्धा

महाराष्ट्र जीत

**अविनाश जाधव प्रतिनिधी**

**कळंबोली वार्ताहरः-** कळंबोली येथे क्रिकेट स्पर्धेचे आयोजन, भारतीय जनता पक्ष व युवा मोर्चा कळंबोली यांच्यामार्फत पनवेल महापालिका सभागृह नेते एडवोकेट श्री नरेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार दिनांक 17 व रविवार दि. 18 रोजी भव्य अशा अंडरआर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन कळंबोली येथे करण्यात आले आहे. अंडर आर्म क्रिकेट स्पर्धा ही रोड पाली येथील नवीन बस डेपो च्या ग्राउंड वरती दिनांक 17 व दिनांक 18 रोजी दिवस रात्र खेळण्यात येणार आहे. ही स्पर्धा सभागृहने देणारेच ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेले असून या स्पर्धेच्या विजेत्यांना भरघोस असे बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे. या स्पर्धेत प्रथम येणाऱ्यास 21,111 रुपये व भव्य चषक, द्वितीय येणाऱ्यास 11,111 रुपये व चषक , तृतीय आणि चतुर्थ येणाऱ्यास प्रत्येकी 5,555 रुपये व चषक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक सामन्यात सामनावीर चा सन्मान हे करण्यात येणार आहे. यामुळे परिसरातील खेळाडूंना आपल्या कौशल्याला वाव देण्यात येईल



# नवबौद्धांची नवी वाटचाल : धानोरा येथील गावई व तायडे कुटुंबातील तीन बालकांना श्रामणेर दीक्षा

महाराष्ट्र जीत

**दारव्हा (प्रतिनिधी विक्रांत शिरसाट)** – भारतीय बौद्ध महासभा (दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया) तर्फे दारव्हा येथे आयोजित श्रामणेर शिबिरात गावई व तायडे कुटुंबातील तीन बालकांनी बौद्ध धम्मात प्रवेश करत श्रामणेर दीक्षा प्राप्त केली. दिनांक ७ मे ते १२ मे २०२४ दरम्यान पार पडलेल्या या शिबिरात विश्वजीत संजय गवई, प्रसन्न संजय गवई, कुणाल यशवंता गवई आणि लोकेश सुभाष तायडे यांनी सहभागी होत बौद्ध भिक्षू जीवनाची पहिली पायरी पार केली. या शिबिरामध्ये बाल श्रामणेरांना बुद्ध धम्म, पंचशील, अष्टांगिक मार्ग, ध्यान व संयमाचे शिक्षण देण्यात आले.



भगव्या वस्त्रांमध्ये दीक्षा घेतलेल्या या बालकांनी समर्पण व शिस्तीचे दर्शन घडवले. दीक्षेप्रसंगी संजय पुंडलिकराव गावई व त्यांच्या पत्नी प्रज्ञा संजय गावई यांनी उपस्थित राहून आपल्या मुलांच्या धार्मिक वाटचालीत सहभाग नोंदवला. या प्रेरणादायी क्षणाने संपूर्ण परिसरात आनंदाचे व गौरवाचे वातावरण निर्माण झाले आहे. या शिबिराचे प्रमाणपत्र डॉ. भीमराव वाय. आंबेडकर (राष्ट्रीय कार्याध्यक्ष) व डॉ. हरीश रावालिया (अध्यक्ष) यांच्या स्वाक्षरीने प्रदान करण्यात आले.

# सनराईज ज्युनिअर कॉलेज मालेगाव येथील शंभर टक्के निकालाची परंपरा कायम !

महाराष्ट्र जीत

**मालेगाव / सुरज अवचार** :- राज्य मंडळांनी जाहीर केलेल्या फेब्रुवारी २०२५ वर्ग १२ वी च्या परीक्षेच्या निकालामध्ये सनराईज ज्युनिअर कॉलेज मालेगाव ने 100% निकालाची परंपरा कायम राखली आहे. विज्ञान शाखेमधून एकूण ५१ विद्यार्थ्यापैकी ५ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणी मध्ये उत्तीर्ण झाले , २३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले व २३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले. सनराईज ज्युनिअर कॉलेज मालेगाव मधून प्रथम क्रमांक कु. तेजस्विनी नामदेव सुडके ८८% द्वितीय क्रमांक कु. वेदांती अरुण घवळे ७८% व तृतीय क्रमांक कु.स्वाती भारत देशमुख ७७% यांनी मिळवला. दी. आर्य शिक्षण संस्था, रिसोड संस्थेचे अध्यक्ष तथा माजी खासदार अनंतरावजी देशमुख व विश्वस्त जयश्रीताई देशमुख सचिव अँड. नकुल दादा देशमुख व सर्व सन्माननीय संचालक मंडळ कॉलेजचे प्राचार्य प्रा. सदानंद सुर्वे, प्रा. संदीप इंगोले , प्रा, मनोज निकम प्रा. बालाजी गवळी प्रा. अंकुश वानखेडे प्रा. दुर्गेश पावडे सर तथा प्राध्यापक प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या..



कु.तेजस्विनी नामदेव सुडके
प्रथम क्रमांक 88 %





# लेंडी धरणाच्या कामाला गती; लवकरच तेलंगणा सरकारसोबत उच्चस्तरीय बैठक

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने**



मुखेड, देगलूर व बिलोली तालुक्यांसाठी वरदान ठरणारा आंतरराज्यीय लेंडी धरण प्रकल्प आता अंतिम टप्प्यात आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांच्या पुढाकाराने प्रकल्पाला वेग मिळाला असून, 2027 पूर्वी प्रकल्प पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. प्रकल्पासाठी तेलंगणा सरकारच्या 240 कोटींच्या सहभाग निधीसाठी लवकरच उच्चस्तरीय बैठक बोलावण्यात येणार आहे. आज धरणस्थळी भेट देऊन कामाचा आढावा घेतला. सोबत जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. प्रकल्पातील पुनर्वसन व अडचणींसंदर्भातही चर्चा झाली. तळणीच्या बुडित क्षेत्रातील जिगळा व रामतीर्थ गावांच्या पुनर्वसनास गती देणे, वनविभागाच्या अनावश्यक परवानग्या टाळणे, अतिक्रमणाची कारवाई, अद्ययावत ७/१२ नोंदी, बेघरांची मंजुरी, स्वेच्छा पुनर्वसन यादी पूर्ण करणे, ग्रामपंचायत निर्मिती आणि मतदार यादी समावेश यासारख्या विषयांवर पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. प्रकल्प पूर्णत्वाकडे जात असून, उर्वरित कामे गतीने पूर्ण करण्यासाठी सर्वस्तरांवर समन्वय वाढवण्यात येणार आहे.


# लेंडी धरणाच्या कामाला गती; लवकरच तेलंगणा सरकारसोबत उच्चस्तरीय बैठक

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने**

मुखेड, देगलूर व बिलोली तालुक्यांसाठी वरदान ठरणारा आंतरराज्यीय लेंडी धरण प्रकल्प आता अंतिम टप्प्यात आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांच्या पुढाकाराने प्रकल्पाला वेग मिळाला असून, 2027 पूर्वी प्रकल्प पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. प्रकल्पासाठी तेलंगणा सरकारच्या 240 कोटींच्या सहभाग निधीसाठी लवकरच उच्चस्तरीय बैठक बोलावण्यात येणार आहे. आज धरणस्थळी भेट देऊन कामाचा आढावा घेतला. सोबत जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. प्रकल्पातील पुनर्वसन व अडचणींसंदर्भातही चर्चा झाली. तळणीच्या बुडित क्षेत्रातील जिगळा व रामतीर्थ गावांच्या पुनर्वसनास गती देणे, वनविभागाच्या अनावश्यक परवानग्या टाळणे, अतिक्रमणाची कारवाई, अद्ययावत ७/१२ नोंदी, बेघरांची मंजुरी, स्वेच्छा पुनर्वसन यादी पूर्ण करणे, ग्रामपंचायत निर्मिती आणि मतदार यादी समावेश यासारख्या विषयांवर पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. प्रकल्प पूर्णत्वाकडे जात असून, उर्वरित कामे गतीने पूर्ण करण्यासाठी सर्वस्तरांवर समन्वय वाढवण्यात येणार आहे.





महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी मुद्रक आर्यन प्रिंटर्स गांधी चौक कारंजा लाड येथे मुद्रीत करून दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय, कारंजा लाड, जि. वाशिम येथे प्रकाशित केले. भ्रमणध्वनी - ९९२१०४५१२१, ९६०४४३०००२ ( सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत ) ( या आवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहील. )


१ २ ३ ४ ५ ६

## वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड श्रेणी ऑफलाईन प्रशिक्षणाच्या तारखेत बदल करण्यात यावे; शेख अब्दुल रहीम
### बकरी ईद 7 जून रोजी असल्याने प्रशिक्षणाच्या तारखेत बदल करण्याची मागणी!

महाराष्ट्र जीत



**छत्रपती संभाजीनगर वार्ताहर**
राज्यात सध्या वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड श्रेणी ऑफलाईन प्रशिक्षणाची चर्चा सुरू आहे आणि आज राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुण्याच्या अधिकृत वेबसाइटवर वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी प्रशिक्षण सर्व जिल्ह्यामध्ये एकाच टप्प्यात म्हणजेच 2 जून ते 12 जून2025 पर्यंत सुरू होणार आहे. अशी माहिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या अधिकृत वेबसाइटवर झळकत आहे. *मुस्लिम समाजातील दुसरा मोठा सण म्हणजे बकरी ईद (ईद उल अज़हा) येत्या 7 जून रोजी आहे आणि 8 ते 9 जून असे सलग तीन दिवस चालते.* मुस्लिम समाजामध्ये हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो म्हणून हे प्रशिक्षण मे महिन्याच्या शेवटचा आठवडा अर्थातच 26 मे ते 4 जून 2025 पर्यंत सुरू करावे. किंवा बकरी ईद (7 जून) आणि दुसरे दिवस (8 जून) असे दोन दिवस प्रशिक्षणाला सुट्टी ठेवावी जेणेकरून मुस्लिम समाजातील शिक्षक बांधवांना सण साजरा करण्यात कोणतीही अडचणी येणार नाही व प्रशिक्षणही व्यवस्थित पार पडेल. अशी मागणीचे निवेदन मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. यांना सादर करण्यात आले. निवेदनाची एक प्रत मा. प्रधान सचिव साहेब, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई. आणि मा. शालेय शिक्षण आयुक्त साहेब, शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे. यांना ही सादर करण्यात आली आहे. निवेदनावर महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन चे राज्य प्रवक्ता तथा हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर यांची स्वाक्षरी आहे...

## रक्तस्त्रावात आढळला इसमाचा मृतदेह घातपात की अपघात कारण अस्पष्ट

महाराष्ट्र जीत



**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
राळेगाव : राळेगाव येथील आंबेडकर चौकात दि.१५ मे ला सकाळच्या सुमारास एका ४८ वर्षीय इसमाचा दारूच्या नशेत पडून झालेल्या रक्तस्त्रावामुळे मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. मृताचे नाव संजय प्रल्हाद किन्हेकर असून ते दापोरी (कलार), ता. राळेगाव येथील रहिवासी असून अभिजीत राजेंद्र किन्हेकर (वय २० वर्ष, व्यवसाय सलून, रा. गांधी नगर, आर्वी नाका, वर्धा) यांनी राळेगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, मृत संजय हे त्यांचे काका होते.संजय किन्हेकर हे गेल्या अनेक वर्षांपासून दारूच्या व्यसनात गुरफटले होते. त्यांच्या पत्नीसोबतचे संबंध देखील यामुळे तुटले होते व त्यांची पत्नी त्यांना १८ वर्षांपूर्वी सोडून गेली होती. सध्या ते दापोरी येथील आपल्या आईवडिलांसोबत राहत होते. मृतक संजय काही दिवसांपासून गावातील शुभम लोहाटे यांच्या मंडप डेकोरेशनच्या कामावर होते. दि. १५ मे रोजी सकाळी ६ वाजता कुटुंबीयांना फोनवरून माहिती मिळाली की संजय यांना रक्तस्त्राव होऊन मृत्यू झाला आहे. तातडीने कुटुंबीयांनी ग्रामीण रुग्णालय, राळेगाव येथे धाव घेतली असता, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. संजय यांना दारूच्या नशेत पडल्याने गंभीर दुखापत झाली आणि त्यातून रक्तस्त्राव होऊन त्यांचा मृत्यू झाला, असा प्राथमिक अंदाज आहे.घटनास्थळी पोलीसांनी पंचनामा केला असून, या प्रकरणाचा पुढील तपास राळेगाव पोलीस स्टेशनचे पो.नि. सिताराम म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## चारगाव कुणबी समाज संघटनेतर्फे १७ व १८ रोजी क्रिकेट स्पर्धा

**चिपळूण (प्रतिनिधी):**
– चारगाव कुणबी समाज संघटनेतर्फे पाली भुवडवाडी येथे चारगाव कुणबी समाज चषक दिनांक १७ व दिनांक १८ मे रोजी ओपन ओव्हर आर्म क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतील विजेत्या संघांना रोख रक्कम व आकर्षक चषक देऊन गौरवण्यात येणार आहे. चारगाव कुणबी समाज संघटनेतर्फे दरवर्षी क्रीडा व समाज उपयोगी उपक्रम राबवले जातात गेल्यावर्षी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तर यावर्षी क्रिकेट स्पर्धेचे नियोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते मनोहर आदावडे आमदार शेखर निकम, आमदार भास्कर जाधव, माजी आमदार सदानंद चव्हाण, वाशिष्ठी डेअरीचे चेअरमन प्रशांत यादव, गुहागर नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष राजेश बेंडल, माजी जि. प. सहदेव बेटकर, माजी जि. प. सदस्य अरविंद चव्हाण, चारगाव श्रीरामवरदायिनी देवस्थान मंडळ अध्यक्ष सूर्यकांत महाडिक, सचिव राजेंद्र महाडिक, निरबाडे सरपंच रोहन महाडिक, खांदाट पाली सरपंच सौ. भार्गवी खेडेकर, काडवली कुंभवलीच्या सरपंच सौ. भक्ती महाडिक, उपसरपंच रोहित आग्रे आदी उपस्थित राहणार आहेत. तरी या स्पर्धेच्या उद्घाटनासह क्रिकेट स्पर्धेचा आनंद घ्यावा, असे आवाहन चारगाव कुणबी समाज संघटनेतर्फे करण्यात आले आहे.

# लेखणी रत्न पुरस्काराने पत्रकार राष्ट्रपाल भोंगाडे सन्मानित

महाराष्ट्र जीत




राळेगाव :-- आपल्या लेखणीतून जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडून तळागाळातल्यांचा आवाज शासन दरबारी पोहोचून सदैव न्याय देण्याची भूमिका जोपासत असलेले व पत्रकारिता क्षेत्रात उत्कृष्ट लिखाण, उत्तम भाषा,शब्द संग्रह,बातमी मांडण्याची पद्धत या त्यांच्या कार्याबद्दल राष्ट्रपाल मुद्रका वामन भोंगाडे यांना लेखणीरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. राष्ट्रशक्ती फिल्म मुंबई द्वारा आयोजित संत गाडगेबाबा पुरस्कार सोहळा २०२५ च्या वतीने सामाजिक, राजकीय, सहकार ,शिक्षण, उद्योग, कृषी, साहित्य, कला, क्रीडा ,आरोग्य ,पत्रकार ,युवा, महिला बचत गट, महिला मंडळ ,आदर्श ग्रामपंचायत ,डान्स, सोलो डान्स, ग्रुप डान्स, एक पात्री नाट्य प्रयोग, संगीत/ गायन, फॅशन शो पारंपारिक वेशभूषा आदी विविध क्षेत्रातील कार्य करणाऱ्यांना कलारत्न पुरस्कार, समाज रत्न पुरस्कार, व लेखनी रत्न ,पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा सेलिब्रेशन हॉल मेडिकल कॉलेज चौक यवतमाळ येथे दिं ११ मे २०२५ रोज रविवारला पार पडला असून या पुरस्कार सोहळ्या प्रसंगी आमदार बाळासाहेब मांगुळकर विधानसभा यवतमाळ, संतोष अरसोड सत्यशोधक गाडगेबाबा या पुस्तकाचे लेखक,डॉ. अंजली गवार्ले,संचालिका गवार्ले पाइल्स हॉस्पिटल तथा मेडीस्क्रीन भारत इंटरनॅशनल सोशल आयकन यवतमाळ, मा. बाबाराव मडावी आकांतकार यवतमाळ, राष्ट्रफिल्म चे अध्यक्ष रवी भोंगाडे,अतुल कुडवे सीने दिग्दर्शक मुंबई ,अक्षय राजेश अहिव सह्याद्री दूरदर्शन वर्धा जिल्हा प्रतिनिधी, संदीप उरकुडे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया संपादक संघ मुंबई, श्रीकांत भाके अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई शाखा कारंजा, हफिज खान संगीत दिग्दर्शक कोरिओ ग्राफर व पत्रकार संघ कारंजा, आदी मान्यवरांच्या उपस्थित राष्ट्रपाल मुद्रका वामन भोंगाडे यांना लेखनीरत्न पुरस्कार व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे तसेच जानेवारी महिन्यात ही वणी येथे राष्ट्रपाल भोंगाडे यांना माणिक रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते त्यांना मिळालेल्या लेखणी रत्न पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वच स्तरातून राष्ट्रपाल भोंगाडे यांचे कौतुक होत आहे.

## चिखलगाव येथे अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साह संपन्न

महाराष्ट्र जीत



**प्रतिनिधी**
**पुणे.** खेडच्या पश्चिम भागात चिखलगाव हे वारकरी संप्रदायाचे गाव म्हणून ओळखले जाते येथे अनेक नवीन जुने कीर्तनकार आपली कीर्तन रुपी सेवा करीत आहे या गावांमध्ये गेली सात दिवस अनेक नामवंत कीर्तनकारांनी आपली हजेरी लावली याप्रसंगी काल्याचे किर्तन संत दास महाराज मनसुख यांच्या सेवेच्या माध्यमातून करण्यात करण्यात आले किशोर महाराज बांगर सागर महाराज शिर्के देवेंद्र महाराज निढळकर बाळशिराम मिंडे दिनेश महाराज माने श्रावण महाराज जगताप यांची कीर्तन रुपी सेवा घडली काल्याचे किर्तन संत दास महाराज यांनी केले या कार्यक्रमाच्या निमित्ताने खेड तालुक्याचे माजी कार्य सम्राट आमदार दिलीप मोहिते पाटील पुणे जिल्हा दूध संघाचे संचालक अरुण शेठ चांभारे खेड पंचायत समितीचे माजी सभापती सुरेश शेठ शिंदे चिखलगाव चे राष्ट्रवादीचे सरचिटणीस श्री लक्ष्मणराव मुके इत्यादी मान्यवर सकाळचे पत्रकार लोथे साहेब पुढारीचे पत्रकार आदेश भोजने पत्रकार दै. युवक आधार जे पत्रकार डॉ. देवेंद्र ओहाळ इत्यादी मान्यवर बहुसंख्येने उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वागत चिखलगाव नगरीचे मा. सरपंच बाळासाहेब गोपाळे यांनी केले

## गायन क्षेत्रातील उगवती तेजस्वी चांदणी ईश्वरी लोहोटे,कला भूषण पुरस्काराने सन्मानित...!




**मुंबई प्रतिनिधी**
बालवयातच कलात्मक धोरण अवलंबुन नृत्य,सामाजिक बांधिलकी,गायन तसेच सांस्कृतिक क्षेत्रात आपले नाव उज्वल करणारी मुलगी म्हणजे ईश्वरी लोहोटे. कलागुण संपन्न,गोड गळ्याची गायिका,सामाजिक क्षेत्रात अग्रेसर, नृत्य, शिक्षणात हुशार विविध क्षेत्रात आपल्या गुरुजनांचे व आईवडीलांचे नाव अजरामर करणारी इयत्ता सातवी मध्ये शिकणारी मुलगी ईश्वरी लोहोटे. तीच्या या चतुरस्त्र कामगिरीची दखल मुंबईच्या आर्यारवी एंटरटेन्टमेन्ट या संस्थेने घेतली. नुकताच शिशुविकास हॉल,राजकमल स्टुडिओ,परेल येथे आर्यारवी एंटरटेन्टमेन्टने आयोजित केलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव व पुरस्कार वितरण सोहळ्यात ईश्वर लोहोटे हिला"कला भूषण" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार प्रसिद्ध सिने-नाट्य अभिनेते जयराज नायर, प्रसिद्ध सिने नाट्य अभिनेते, दिग्दर्शक प्रदीप कबरे, जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, समाजसेविका सीमाताई पाटील, ग्राफीक डिझायनर मनिष व्हटकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.ईश्वरी लोहोटे हिने गायन क्षेत्रातील विविध टप्यातील परीक्षा देऊन प्राविण्य मिळविलेले आहे.नाट्य,सामाजिक क्षेत्र, नृत्य, गायन, शिक्षण या क्षेत्रात उत्तम कार्य केल्याबद्दल विविध क्षेत्रातील सामाजिक संस्थांचे पुरस्कार, सन्मानपत्र, प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.तसेच प्रसिद्ध सिने-नाट्य, लेखक-दिग्दर्शक वामन केंद्रे यांच्या कार्यशाळेत शिक्षण घेत आहे.ईश्वरी लोहोटे हिला"कला भूषण"पुरस्कार मिळाल्याबद्दल तीचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# श्री.श्री.१०८ महंत सुधाकरदासजी महाराज यांचा श्री गुरु अभिनंदन सत्कार सोहळा

### हजार वर्षा नंतर हि महंत सुधाकरदासजी महाराज यांची सनातन कीर्ती विश्व पाहिलं...मा. खा.संजीव नाईक

महाराष्ट्र जीत

**पनवेल वार्ताहर**
पनवेलच्या पवित्र भूमीत १९८६ साला पासून श्री स्वामी समर्थांच्या कृपेने व गुरुमाऊली नाना महाराज परांजपे यांच्या आशीर्वादाने तसेच श्री महंत सुधाकरदासजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी समर्थ मठाची स्थापना महंत सुधाकर महाराज यांनी करत सामाजीक व आध्यात्मिक कार्याची परंपरा चालु केली. शुक्रवार दि.१५ रोजी पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात श्री १००८ महामंडळेश्वर महंत काशिनाथ दास महाराज, श्री गुरु खाशाबादास महाराज , श्री महंत श्रीकांत जी महाराज, श्री स्वामी देवानंद गिरीशजी महाराज , कविताश्रीजी ताई महाराज पाटील, श्री महंत वैभवदास महाराज पाटील, श्री महंत श्रीकांत धुमाळ महाराज अशा थोर संत महंतांच्या उपस्थितीत पनवेल येथील स्वामी समर्थ भक्त मंडळाच्या वतीने महंत सुधाकरदासजी महाराज यांचा श्री गुरु अभिनंदन सत्कार सोहळा मोठया भक्ती भावात आनंद उत्साहात संपन्न झाला. यावेळी महंत सुधाकरदासजी महाराज यांच्या सामाजिक ,शैक्षणिक ,धार्मिक अध्यात्मिक अशा विविध क्षेत्रातील कार्याची माहिती व्यासपीठावरील मान्यवरांनी देत ,सनातन धर्माचा प्रचार ,प्रसार ,संरक्षण, संस्कृतीत पनवेल चे नामलौकीक स्थान निर्माण करण्याच कार्य या माध्यमातून होत असल्याचा अभिमान व्यक्त केला. यावेळी माजी खासदार संजीव नाईक , माजी आमदार बाळाराम पाटील , आमदार विक्रांत पाटील , मा. सभागृह नेते परेशशेठ ठाकूर , मा. विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे,भाजप नेते सय्यद अकबर, माजी नगरसेवक सतीश पाटील ,गणेश कडू, प्रीती जॉर्ज म्हात्रे आदी मान्यवर मोठ्या संख्येने शुभेच्छा व आशीर्वाद घेण्यासाठी उपस्थित होते. हिंदू संस्कृति नुसार सनातन धर्माच्या रक्षणासाठी , कल्याणासाठी हजार वर्षा नंतर हि महंत सुधाकरदासजी महाराज यांची सनातन कीर्ती विश्व पाहिलं व त्या कार्यात आम्ही सारी राजकीय स्तरावरील मंडळी महंत घरत महाराज्यांच्या पाठीशी आहे असे मा. खा.संजीव नाईक यांनी सांगितले. पनवेलकरांच्या साथीने स्वामींच्या कार्याची प्रचलिती मानव सेवेच्या रूपाने करताना आपले सारे जीवन गुरुवर्य सुधाकर महाराजांनी समर्पित केलेलं आहे. भावी ,भक्तांच्या जीवनात पालकाची भूमिका बजावत आदराचे स्थान निर्माण करणाऱ्या देवमाणसाच्या गुरू अभिनंदन सोहळ्यात उपस्थित राहण्याचा भाग्य मिळाल्याचे समाधान माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी व्यक्त केला. अवधूत सुधाकर घरत व कांचन ताई तसेच पनवेल स्वामी समर्थ भक्त मंडळाच्या वतीने महंत सुधाकरदासजी महाराज यांचा त्यांच्या सेवेकरी अनुयायीच्या वतीने श्री गुरु अभिनंदन सत्कार सोहळा मोठया जल्लोषात स्वामींच्या नामकरणात संपन्न झाला. उपस्थित मान्यवरांचा पनवेल स्वामी समर्थ भक्त मंडळाच्या वतीने भेट वस्तू व सन्मानचिन्ह पुष्पगुच्छ देऊन सन्मान सत्कार करण्यात आला. मंडळाचे अध्यक्ष संजय पाटील व सदस्यांनी स्वामी सत्कार गुरू अभिनंदन सोहळा यशस्वी करण्यासाठी मोठी मेहनत घेतली होती.




पान १ वरून

## 'आयएमएफ'च्या कर्जाचा पाक दहशतवादासाठी वापर करणार

पाकिस्तानला अर्थसहाय्य दिले जाऊ नये. 'आयएमएफ'ने या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी आमची मागणी आहे. मागच्या आठवड्यात आयएमएफ'ने पाकिस्तानला १ अब्ज डॉलरचे कर्ज देण्याचा निर्णय घेतला होता. दोन अण्वस्त्रधारी देशांत लष्करी कारवाई सुरू असताना एवढी मोठी आर्थिक मदत दिली गेल्याने भारताने या निर्णयाविरोधात नाराजी व्यक्त केली होती.

भारताच्या आक्षेपांना न जुमानता आयएमएफ'ने एकूण सात अब्ज डॉलरच्या कर्जाच्या रकमेतील दुसऱ्या हप्त्याचे एक अब्ज डॉलर पाकिस्तानला देण्यास मंजुरी दिली आहे. सध्याच्या पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी हे कर्ज दिल्याचे आयएमएफ'ने जाहीर केले आहे. तसेच भविष्यात १.४ अब्ज डॉलरचा आणखी एक कर्जाचा हप्ता पाकिस्तानला देणार असल्याचेही 'आयएमएफ'ने जाहीर केले आहे.

## मनपाच्या निवडणुका २२७ प्रभागानुसार

दिवशी गोंधळ निर्माण होऊ नये यासाठी मतदान केंद्रांची संख्या वाढवण्यात येणार असल्याचे निवडणूक आयोगातील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. दरम्यान, २० ऑक्टोबरपासून दिवाळीला सुरुवात होत असून दिवाळी आधीच निवडणुकीचा बार उडणार आहे.

७ मार्च २०२२ रोजी नगरसेवकांचा कार्यकाळ संपल्यानंतर ८ मार्चपासून मुंबई महापालिकेत प्रशासकीय राजवट लागू आहे. राज्यात सद्यस्थितीत २९ महानगरपालिकेत प्रशासकीय राज्य आहे. यात जालना व इचलकरंजी या दोन महानगरपालिकांचा समावेश आहे. मुंबई महापालिकेसह अनेक महानगरपालिकेत तीन वर्षांहून अधिक काळापासून प्रशासक कार्यरत आहेत. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने नुकताच निर्णय देत चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या, असे आदेश दिले आहेत.

# भारतीय समाज सेवा केंद्र मार्फत एकदिवसीय उन्हाळी शिबीर संपन्न

महाराष्ट्र जीत



**चिपळूण वार्ताहर**
भारतीय समाज सेवा केंद्र ही एक अनाथ मुलांचे संगोपन आणि त्यांचे दत्तक मार्गाने पुनर्वसन करणारी संस्था आहे. याचबरोबर संस्थेमध्ये अजून दोन प्रकारचे प्रकल्प चालवले जातात. त्यापैकी एक म्हणजे समाजातील गरीब,गरजू हुशार आणि होतकरू मुलांना त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी शैक्षणिक मदतही दिली जाते. या शैक्षणिक मदतीसाठी चिपळूण,मुंबई, पुणे तसेच ऑस्ट्रेलिया, अमेरिका, नॉर्वे येथील प्रायोजकही मदत करत आहेत. विध्यार्थ्यांच्या शैक्षणिक मदतीबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी संस्थेने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. मुलांच्या प्रगतीतील अडीअडचणी लक्ष्यात घेऊन त्या समुपदेशाने दूर करण्याचा प्रयत्नही केला जातो व त्यांना मार्गदर्शन केले जाते. या कार्यक्रमांतर्गत संस्थेच्या मदत योजनेमध्ये सध्या ४४० विद्यार्थी मदत घेत आहेत. या मुलांसाठी वर्षभरामध्ये गेस्ट लेक्चर, शैक्षणिक शिबिरे यांसारखे वेगवेगळे कार्यक्रम राबविले जातात. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून भारतीय समाज सेवा केंद्राकडून सेवासाधना प्रतिष्ठान केतकी येथील श्री. विनीत वाघे सर आणि त्यांचे सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक मदत योजनेच्या विध्यार्थ्यांसाठी एकदिवसीय उन्हाळी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये मुलांसाठी सर्जनशीलता, शिक्षण आणि मजा यांचे मिश्रण होते.

शिबिरासाठी लाभलेले मुख्य मार्गदर्शन श्री विनीत वाघे आणि त्यांच्या सहकार्यांनी सकाळच्या सत्रामध्ये ताजेतवाने आणि सर्जनशील उपक्रम म्हणून एनर्जायझर गाणे घेतले ज्यामुळे दिवसाची सुरुवात उत्साही आणि पुढील उपक्रमांसाठी एक चैतन्यशील वातावरणनिर्मिती तयार झाली. त्यानंतर सर्व विध्यार्थी सहभागातून एक पारंपारिक महाराष्ट्रीयन उन्हाळी पेय, "कैरी पन्हे" तयार करण्यात आले आणि तयार थंडगार पेयाचा सर्वांनी एकत्रित आस्वाद घेतला. यानंतर लगेचच ओरिगामी टोपी बनवण्याच्या वर्कशॉप मध्ये वर्तमानपत्रांच्या पानांचा वापर करून नऊ वेगवेगळ्या प्रकारच्या टोप्या तयार करण्याची कृती दाखवून मुलांकडून करवून घेण्यात आल्या. या प्रत्यक्ष कृतीने केवळ मुलांमधील सर्जनशीलतेला चालना दिली नाही तर त्यांच्यामधील उत्तम कौशल्यांनाही वाव मिळाला. दुपारच्या जेवणानंतरच्या सत्रामध्ये उत्साही वातावरण राखण्यासाठी पुन्हा एनर्जायझर गाण्याची पुनरावृत्ती झाली. त्यानंतर कचरा आणि प्लास्टिकशी संबंधित जागरूकता आणि पर्यावरणीय समस्यांवर प्रकाश टाकणारा एक लघु प्रेरक चित्रपट दाखवण्यात आला, ज्याचा उद्देश विद्यार्थ्यांना शाश्वत पद्धतींचा अवलंब करण्यास प्रेरित करणे होता. त्याचबरोबर सेवा साधना प्रतिष्ठानचे उपक्रम जाणून घेण्यासाठी एक संक्षिप्त व्हिडिओ क्लिप दाखवण्यात आली, ज्यामध्ये त्यांच्या निवासी शिबिरे आणि सामुदायिक सेवा उपक्रमांवर लक्ष केंद्रित केले गेले. या शिबिराचा महत्वाचा टप्पा म्हणजे नारळाच्या करवंटीपासून हस्तकला; विद्यार्थ्यांनी नारळाच्या करवंटीपासून विविध वस्तू तयार करायला शिकल्या, जसे की कीचेन, कानातले, पेंडेंट, मोबाईल होल्डर आणि बरेचकाही . सर्व विध्यार्थ्यांनी हस्तकला बनवण्यात उत्सुकतेने भाग घेतला. "लंबी दादीवाले बाबा" या ऊर्जादायी गाण्याने शिबिराचा समारोप झाला, ज्यामुळे विद्यार्थ्यांना दिवसाच्या अनुभवांमधून समाधान आणि आनंदाची भावना मिळाली. या उन्हाळी शिबिराने केवळ शिक्षण आणि सर्जनशीलतेसाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले नाही तर विद्यार्थ्यांमध्ये समुदाय आणि पर्यावरणीय जागरूकतेची भावना देखील निर्माण केली. विद्यार्थ्यांना हि कार्यशाळा खूप आवडली आणि त्यांचा या कार्यशाळेला प्रतिसादही खूप छान मिळाला. मुलांना नेहमीच्या शिक्षण पद्धतीपेक्षा वेगळे शिकायला मिळाले त्यामुळे विध्यार्थी खूप खुश होते. या शिबिरासाठी सेवासाधना प्रतिष्ठान केतकीचे श्री विनीत वाघे आणि त्यांचे सहकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. प्रास्ताविक सामाजिक कार्यकर्ते श्री.रणजीत शिंदे यांनी केले.संस्थेच्या विविध कामांची माहिती आणि पाहुण्याचे स्वागत सिनिअर सामाजिक कार्यकर्त्या सौ. रोहिणी सूर्यवंशी यांनी केले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी संस्थेचे शाखा संचालक श्री.राजकुमार सासपाडे, सुपरवायझर सौ. सुप्रिया धवन , अकाऊंट सौ. हर्षदा वीरकर ,सामाजिक कार्यकर्ते श्री. सतीश कांबळे आणि परेश इंगावले यांचे सहकार्य लाभले.

## कारंजा शहरात 8 ते 80 वयोगटासाठी"समर कॅम्प 2025"चे आयोजन

कारंजा ( शहर प्रतिनिधी)

तालुका क्रीडा अधिकारी कार्यालय, करंजा (लाड) आणि फिटनेस रफ अँड टफ ग्रुप कारंजा यांच्या संयुक्त विद्यमाने "समर कॅम्प २०२५" चे आयोजन करण्यात आले आहे. सदर कॅम्पचे आयोजन हे २० मे ते २६ मे २०२५ दरम्यान दररोज सकाळी ५.४५ ते ७.१५ या वेळेत तालुका क्रीडा संकुल, बायपास, कारंजा येथे होईल. ८ ते ८० वयोगटातील महिला, पुरुष व लहान मुलांसाठी खुला असलेला आहे. या कॅम्पमध्ये सहभागींसाठी योग व प्राणायाम, ॲथलेटिक्स, कराटे, व्हॉलीबॉल, कबड्डी, बॅडमिंटन, फुटबॉल, कॅरम, खो-खो, विटी दांडू, लेझीम यांसारख्या क्रीडा प्रकारांसह विविध पारंपरिक खेळ आणि मनोरंजनात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच, झुंबा डान्स हे या कॅम्पचे विशेष आकर्षण ठरणार आहे.

नोंदणी प्रक्रिया १३ मे ते २१ मे २०२५ या कालावधीत सुरू राहणार असून, प्रवेश मर्यादित असल्यामुळे इच्छुकांनी लवकरात लवकर आपली नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.




## जळउका येथील सामाजिक कार्यकर्ते लालाजी चव्हाण व रमेश लांडगे यांच्याद्वारे नागरिकांना टँकरद्वारे मोफत पाणी वाटप

महाराष्ट्र जीत

**मालेगाव / सुरज अवचार** :- उन्हाळा सुरू होताच भूजल पातळी कमी होत चालली आहे. मालेगाव तालुक्यातील जउळका गावात गेल्या महिनाभरापासून पाणीटंचाईचे संकट उभे राहिले आहे. त्यामुळे नागरिकांना दिवसभराच्या पाण्यासाठी चणचण भासत आहे. गावातील लोकांना गरजेपुरते पाणी मिळावे, यासाठी जउळका येथील सामाजिक कार्यकर्ते लालाजी चव्हाण व रमेश लांडगे यांच्या वतीने टँकरद्वारे मोफत पाणी वाटप सुरू केले आहे. त्यामुळे गावासीयांना दिलासा मिळत आहे. या पाणी वाटप योजनेच्या शुभारंभप्रसंगी मनोज काळे, सुरेश गर्दे, देविदास ढवळे, प्रविण धोंगडे, राजु शेख कार्यकर्ते उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते लालाजी चव्हाण व रमेश लांडगे यांच्यावतीने टँकरद्वारे मोफत पाणी वाटप सुरू केले आहे.




## मोक्ष भावेश भंडारीचे दहावी मध्ये घवघवीत यश..!

महाराष्ट्र जीत


**गामदेवी,मुंबई (प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)**

यंदा महाराष्ट्र राज्याचा दहावीचा निकाल 94.10 टक्के लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलींनी निकालात बाजी मारली असून उत्तीर्ण झालेल्यी मुलींची टक्केवारी 96.14 अशी आहे, तर मुलांची टक्केवारी 92.21 अशी आहे. यात शारदा मंदिर हायस्कुल, गामदेवी, मुंबई च्या मोक्ष भावेश भंडारी या विद्यार्थ्याने दहावी मध्ये दैदिप्यमान यश संपादन केले आहे. 93 टक्के मार्क्स मिळविणाऱ्या मोक्ष भंडारी याने आपल्या आई वडिलां सोबत आपल्या समाजाचे तसेच आपल्या कुटुंबियांचे देखील नाव रोशन केले आहे. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी असलेले मोक्षचे वडील भावेश सुकनराज भंडारी आणि आई मिता भावेश भंडारी, दादाजी - सुकनराज भंडारी आणि दादीजी - शांता सुकनराज भंडारी कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून मोक्षच्या कलागुणांचे आणि त्याला मिळालेल्या यशाचे मुंबईत सर्वत्र कौतुक केलं जात आहे

## ज्ञानप्रकाश विध्यालय काजळेश्वर मधुन जानवी माहादेव बावने यानी पटकावला प्रथम क्रमांक

महाराष्ट्र जीत

**माहाराष्ट्र जीत प्र**



सविस्तर काजळेश्वर येथील जानवी माहादेव बावने यानी ज्ञानप्रकाश विध्यालय काजळेश्वर मधुन प्रथम क्रमांक पटकावला आहे जानवी हिने हालाखीची परीस्थीती मधुन 86,20 टक्के घेऊन प्रथम क्रमांक पटकावला आहे ( काजळेश्वर चे सरपंच नितिन पा ऊपाध्ये यानी त्या जानवी अभिनंदन केले आहे व या वर्षी जो प्रथम क्रमांक पटकावेल तो 15 आगष्ट स्वतंत्रता दिवशी ग्रामपंचायत काजळेश्वर चे झन्डावदंन च मान या जानवी ने पटकावला आहे असे सागुन जानवी चे पुडिल वाटचालीसाठी अभिनंदन केले आहे

# जव्हार एस टी स्थानक व आगाराचा होणार कायापालट; एसटी स्थानक, आगारांच्या पुनर्बांधणीसाठी 72 जागांची निश्चिती.

### १०० खाटांचे रुग्णालय,रहिवासी संकुल, बाजारपेठची उभारणी होणार.

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत: दयानंद शिंदे**

**पालघर** : राज्याची जीवनवाहिनी असलेली 'एसटी' आता नव्या प्रवासासाठी सज्ज झाली आहे. सर्वसामान्य प्रवाशांना एकाच ठिकाणी निवासी संकुल, आरामदायी प्रवास, दर्जेदार औषधोपचाराचा पर्याय उपलब्ध व्हावा, यासाठी राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने पावले टाकली आहेत. एसटी महामंडळाने पहिल्या टप्प्यात ७२ एसटी स्थानके, आगार पुनर्विकास करण्यासाठी निश्चिती केली आहेत.त्यात जव्हार एसटी आगाराचा समावेश करण्यात आला आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते अड.पारस सहाणे यांनी मागील महिन्यात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन एसटी आगाराच्या परिवहन मंत्री यांच्याकडे मांडल्या होत्या. त्यामुळे



आगाराचे रूप पालटणार आहे प्रवाशांच्या अडचणी सोडवण्याच्या दृष्टीने एसटी महामंडळातील विविध जागांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला आहे. ८४२ ठिकाणांवरील १,३६० हेक्टर जागेचा पुनर्विकास टप्याटप्याने करण्यात येणार आहे. पुनर्विकास होणारी जागा ९९ वर्षांच्या भाडे करारावर विकासकाला देण्यात येणार आहे. एसटी पुनर्विकास प्रकल्प राबवताना केवळ शहरी किंवा जिल्ह्याच्या ठिकाणांवरील जागांना विकासकांचा प्रतिसाद मिळत होता. यामुळे निमशहरी आणि ग्रामीण स्थानक, आगारांकडे दुर्लक्ष होत होते. हे टाळण्यासाठी त्रिस्तरीय धोरण करून शहरातील स्थानक, आगारांचा विकास करणाऱ्या दोन जागेचा विकासकाला अन्य विकास करावा लागेल. एसटी जिल्ह्याच्या जागांच्या मोबदल्यात ठिकाणी १०० खाटांचे रुग्णालय, तालुका आणि ग्रामीण ठिकाणी रहिवासी संकुल, बाजारपेठांची उभारणी होणार. एसटी स्थानकात बसपोर्टच्या धर्तीवर सुविधा निर्माण होणार आहेत. स्थानक, आगारांचे नवनिर्माण करताना सर्व ठिकाणी जल आणि वीज बचतीसाठी अनुक्रमे रेन वॉटर हार्वेस्टिंग, सौरऊर्जा प्रकल्प, चार्जिंग स्टेशन उभारणे बंधनकारक केले आहे.

> राज्य परिवहन महामंडळाला आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर बनवण्यासह सर्वसामान्य प्रवाशांना दर्जेदार प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एसटी महामंडळातील स्थानक, आगार आणि मोकळ्या जागांचा टप्याटप्याने पुनर्विकास करण्यात येणार आहे. यासाठी पहिल्या टप्प्यात ७२ स्थानकांची निवड केली आहे. त्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. आदिवासी बहुल जव्हार आगाराबाबत मागणी करण्यात आल्याने त्याला मंजुरी देण्यात आली आहे.
> **- प्रताप सरनाईक, अध्यक्ष एसटी महामंडळ तथा परिवहन मंत्री**

> प्रयत्नांना यश आले असून एसटी प्रवासी व कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी वेळोवेळी परिवहन मंत्री सरनाईक साहेबांकडे पाठपुरावा सुरू आहे. येत्या काळात नवीन बसेस व आगार व स्थानकाचा काय अप्लेट कायापलट होणार असून त्या ठिकाणी रुग्णालय बाजार संकुल व कर्मचाऱ्यांना इमारती तयार केल्या जाणार आहेत.
> **अड.पारस सहाणे,**
> **सामाजिक कार्यकर्ते**

# फेकम फाकीची पत्रकारीता, पत्रकारीतेचा अपमान

महाराष्ट्र जीत

**महादेव हरणे**

**वाशिम** :- फेक न्यूज'ला आळा घालण्यासाठी केंद्राचा तथ्य तपासणी विभाग एक वर्षापूर्वी स्थापन करुन नव्या माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत अधिसूचना जारी करण्यात आल्या होत्या. भारतात सध्या वास्तववादी बातम्याला बगद देत टि.आर.पी. साठी फेकम फेकी बातम्या प्रसारित करुन लोकांना वास्तवा पासुन दुर ठेवलं जात आहे. इंटरनेटच्या काळात अश्या खोट्या बातम्याची वास्तवीकता उघड पडत असल्याने एक प्रकारे पत्रकारीतेचा अपमान होत आहे. खो-या बातम्या दाखवुन लोकांची माथी भडकविण्याच काम मिडीया करत आहे असे अभ्यासक बोलून दाखवत असल्याने फेक बातम्याने पत्रकारीचेची लक्तरे वेशीला टांगली आहेत हे कुठेतरी थांबायला हवं. भारतीय मिडिया कोणासाठी वातावरण पोषक बनवत आहे? भारत-पाकिस्तान युध्दाच्या बातम्या मिडीयाने प्रसारीत करुन रात्री ९.३० पर्यत अर्ध पाकिस्तान ताब्यात घेतलं. बरं झाले ते तिथेच थांबले नाहीतर सकाळ होता-होता पुर्ण पाकिस्तानवर ताबा मिळवला असता अशा बातम्या बघुन सुज्ञ लोक पत्रकारीतेबद्दल गलिच्छ भाषा वापरत आहेत. पुर्वी बातमीची सत्यता पडताळून बातमी प्रसिद्ध किंवा प्रसारीत केली जात असल्याने पत्रकारीतेला चौथा आधारस्तंभ म्हणून आदर मिळत होता मात्र आता काही पत्रकारांच्या फेक बातम्यामूळे संर्पुण पत्रकारीता बदनाम झाली आहे यावर विचारमंथन व्हायला हवं. सरकार पुढे प्रश्न कोणाचे मांडायचे? सरकारला सवाल विचारून लोक उपयोगी प्रश्न मांडून वंचीत घटकांना न्याय मिळवून द्यायचा सोडून फेकम फाकची पत्रकारीता करणे कितपत योग्य आहे. माध्यमांवरील खोट्या बातम्याना लगाम लागायलाच हवा. केंद्र सरकारने माहिती-तंत्रज्ञान कायद्यात (आयटी कायदा) गतवर्षीच नियम बदलले होते. २०२३ माहिती तंत्रज्ञान कायदा सुधारित नियमावलीनुसार आयटी कायदा २०२१ मध्ये दुरुस्ती करून त्यात नव्या नियमावलीचा समावेश केला होता मात्र या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होतांना दिसुन येत नाही. कोरोना काळात सुध्दा अत्यंत भयावह परिस्थितीच्या बातम्या प्रसार माध्यमांनी प्रसारीत केल्या होत्या. मृत्यू चे तांडव दाखवून लोकांना सजग, जागृत व भयमुक्त करण्यापेक्षा भितीदायक वातावरणाची निर्मिती केली गेली. कोरोनाचे वास्तव मात्र नतंर उघड पडत गेल्याने बघीतलेल्या बातम्या व नतंर उघड पडलेली प्रसारमाध्यमे यावर लोकांचा विश्वास कमी झाला. मुख्यतः प्रसारमाध्यमे ही लोकांच्या जिवावर उड्या मारतात. लोकांनीच जर प्रसारमाध्यमांची कोंडी केली तर लोकशाहीचा चौथा स्तंभ कोसळायला वेळ लागणार नाही. लोकांना वास्तव कळायला हवं. यासाठी सत्य बातम्या व त्याची सत्यता लोकाभिमुख व्हायला हवी. तरच लोकांचा प्रसारमाध्यमावरील कमी झालेला विश्वास वाढेल.




## देगलूर येथे नांदेड शहर व तालुक्यातील सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांसमवेत विकास आढावा बैठक

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने**



देगलूर येथे आयोजित बैठकीमध्ये नांदेड शहर व तालुक्यात सुरू असलेल्या आणि प्रस्तावित विविध विकास कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. माझ्या खासदार निधीतून राबविण्यात येणाऱ्या कामांबरोबरच लोकहिताच्या नव्या योजनांवर चर्चा झाली. पाणीपुरवठा सुधारणा – गाव व शहरांमध्ये शाश्वत आणि स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी प्रस्तावित योजनांची माहिती घेण्यात आली. रस्ते व वाहतूक सुविधा – अंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण, नवीन रस्त्यांची कामे आणि शहरातील वाहतूक समस्यांवर उपाययोजना. स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन – स्वच्छ भारत अभियानांतर्गत नवीन कचरा संकलन यंत्रणा, डंपिंग यार्डसाठी जागा निश्चिती व कचरा विल्हेवाटीबाबत उपाय. क्रीडा सुविधांचा विकास – युवकांसाठी मैदाने, जिम्नॅशियम, इनडोअर क्रीडा संकुले उभारण्याबाबत ठोस चर्चा. ज्येष्ठ नागरिक व महिला सुविधा – वृद्धांसाठी विश्रांतीगृहे, वाचनालये, आरोग्य तपासणी शिबिरे आणि महिलांसाठी प्रशिक्षण केंद्रांबाबत प्रस्ताव मांडले. बैठकीत अधिकारी वर्गाला प्रत्येक कामाचे वेळापत्रक, प्रगती अहवाल आणि अडचणींबाबत खुलेपणाने संवाद साधण्याच्या सूचना दिल्या. जनतेचे प्रश्न आणि मागण्या लक्षात घेऊन कामांचा प्राधान्यक्रम ठरविण्यावर भर देण्यात आला. विकास हा सतत चालणारी प्रक्रिया आहे. प्रशासन,लोकप्रतिनिधी आणि जनतेच्या सहभागातून आपण आपल्या मतदारसंघाचा सर्वांगीण विकास साधू. राज्यसभा खासदार डॉ.अजितजी गोपछडे

## बार्शी टाकळी महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटना

### तालुका अध्यक्षपदी आसराताई भगत उपाध्यक्षपदी आम्रपाली जाधव यांची निवड

महाराष्ट्र जीत

**(प्रतिनिधी भारत चव्हाण सारकिन्ही)**



सारकिन्ही,महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटनेची कार्यकारणी जिल्हा प्रशिक्षण केंद्र अकोला येथे राज्य अध्यक्ष अशोक जयसिंगपूर यांच्या यांच्या उपस्थितीमध्ये पार पडली यावेळी बार्शीटाकळी तालुका अध्यक्षपदी उपकेंद्र तिवसा येथील आरोग्य सेविका आसरा ताई भगत यांची एक मताने निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी झोडगा येथील आरोग्य सेविका आम्रपाली जाधव यांची उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष संगीता ताई जाधव जिल्हा सरचिटणीस संजय डाबेराव, उपाध्यक्ष विष्णू लाड, कार्याध्यक्ष शुभांगी ताई बारबदे, कोषाध्यक्ष मंगलाताई तितुर उपस्थित होत्या, कार्यक्रमाचे संचालन विभा पाथरकर यांनी केले तर आभार प्रदर्शन रूपाली तूपोणे यांनी मानले.

# जलतारा प्रकल्पाच्या पुरनत्वासाठी सामाजिक संस्था उतरल्या .

### मुरंबी गावाला प्रकल्पातील जलतारा खड्डे खोदण्यासाठी जे सी पी ची मदत .

महाराष्ट्र जीत

कारंजा लाड प्रतिनिधी गाव पाणी टंचाई मुक्त करण्यासाठी जिल्हाभर मोहीम सुरू असून त्यासाठी जिल्हा प्रशासन युद्ध पातळी वर कार्य करीत आहे त्यासाठी खुद्द जिल्हाधिकारी यांनी प्रशासनाला कामाला लावले असून यातून जिल्हा भर जलतरा मोहीम राबविली जात आहे .आणि हे काम अधिक गतीने व्हावे यासाठी सामाजिक संस्था या कामाला गती देण्यासाठी उतरल्या आहेत .तालुक्यातील मुरबी ग्राम पंचायतीने जलतारा मोहीम प्रत्येक शेतकऱ्याने रा गाव पाणीदार करण्याचे ठरविले आहे यासाठी खुद्द गावच्या सरपंच संगीता चौधरी यांनी पुढाकार घेतला आहे आता या गावाला पाणीदार करण्यासाठी कॉटन कनेट संस्थेने गावाला जलतारा ची खड्डे करण्यासाठी जेसीपी आणि टक्तर देऊन मदत केली आहे या कामाला करण्यासाठी गावाला Cotton Connect KVGPS BC प्रकल्पा अंतर्गत JCB उपलब्ध करून देण्यात आली यांचं मशिन दारे कामाचा शुभारंभ कारंजा विधानसभा आमदार श्रीमती सईताई डहाके यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कारंजा तहसीलदार कुणाल झाल्टे ग्राम महसुल अधिकारी वानखडे कृषी विभागाचे कृषी प्रवेशक ढोकने कृषी सहाय्यक मंगेश सोळंके गावचे सरपंच संगिताताई बाबुराव चोधरी रोजगार सेवक वॉटर हिरो गावातील शेतकरी हजर होते गावाचे एकूण क्षेत्र ७४८ एकर आहे त्यात आतापर्यंत गावात ९०/१०० जलतारा खड्डे झाले आहेत उर्वरित बाकी खड्डे योग्य नियोजन करून पूर्ण करण्यासाठी मशिन देण्यात आली खड्डे करणे व मागेच ट्रॅक्टर दारे दगड टाकून काम पूर्ण करणे चालु झाले असून यासाठी गावातील कारंजा कृषी बाजार समितीचे संचालक बापूराव पाटील चौधरी कृषी पर्यवेक्षक ढोकणे , कृषी सहाय्यक मंगेश सोळंके BC कर्मचारी क्षेत्र प्रवर्तक संतोष भागवत , अविनाश राठोड यांचेसह गावातील शेतकरी सतिश चोधरी. पांडुरंग इंगोले, देवानंद कांबळे, मिलिंद कांबळे, भानुदास चोधरी,. शंकर कुकडे, आणि शेतकरी यांची गाव पाणीदार करण्यासाठी परिश्रम घेत आहेत. गावातील शेतकरी गावकरी गावाला टंचाई मुक्त गाव करण्यासाठी व यातून गावाला पारीतोषिक मिळून देण्यासाठी प्रयत्न करनार असल्याचे सरपंच संगीता चौधरी यांनी सांगितले आहे .



# बीकेसी अंतर्गत रस्त्यावरील सायकल ट्रॅक हटवण्याचा एम आर डी ए चा निर्णय

महाराष्ट्र जीत

**अविनाश जाधव प्रतिनिधी**

**कळंबोली वार्ताहर**:- मुंबई येथील बांद्रा कुर्ला संकुल (बीकेसी) येथील अंतर्गत रस्त्यावरती असलेल्या सायकल मार्गिका अखेर एमएमआरडीए प्रशासनाने हटवण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय कितपत योग्य आहे हे पुढील भविष्य सांगू शकेल. बीकेसी व कलानगर येथून प्रवास करण्यासाठी शिव रेल्वे उड्डाणपूल बंद असल्या कारणामुळे होणाऱ्या वाहतुकीच्या कोंडीतून नागरिकांची सुटका व्हावी. बीकेसी येथील सायकल मार्गिका हटवून त्या जागी रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे एमएमआरडीएने ठरवलेले आहे. त्यामुळे वाहतुकीची कोंडी कमी होईल असा दावा एमएमआरडीएने केला आहे. सायकल मार्गे का हटवण्याचे ही योजना मुंबई पोलीस वाहतूक यांच्या सहकार्याने सादर केलेली असून, एमएमआरडीए प्राधिकरणात बैठकीमध्ये मंजुरी दिलेली



कोंडी व शिव उड्डाणपूल बंद कल्यामुळे होणारे वाहतूक कोंडीमुळे येथे वाहतुकीची समस्या सतावत आहे, बहुतांश लोक हे बांद्रा कुर्ला उन्नत मार्गाचा वाहतुकीसाठी वापर करत आहेत. बीकेसी उन्नत मार्ग हा लहान वाहनांसाठी अनुकूल आहे, परंतु शिव उड्डाणपूल बंद असल्याकारणाने या मार्गेगेथून मोठे बसेस व लहान वाहने



यांची रहदारी चालू आहे. यामुळे बीकेसी मध्ये वाहतूक कोंडी होत आहे. ही समस्या सोडवण्यासाठी एमएमआरडीएने तातडीची तसेच दीर्घकालीन उपाययोजना राबवण्याचे ठरवलेले आहे.

**एकेरी वाहतूक व्यवस्था**

बीकेसीतील अंतर्गत दळणवळण सुरळीत करण्याकरिता बीकेसी अंतर्गत रस्त्यावरती एकेरी वाहतूक करण्यात येईल, मुख्य रस्त्यावरती होणारी जास्त वाहतूक त्या जागी एकेरी दुहेरी वाहतुकीचा पर्याय ठेवून मार्गी का वाहतुकी सोडण्याचे असे मत तज्ञांच्या शिफारशीने व वाहतुकीच्या अभ्यासाच्या आधारे ठरविण्यात आले आहेत.

**प्रवासात असा होणार बदल**

- सध्या बीकेसी अंतर्गत रस्ता 2+2 मार्गीका (७ मी+७ मी) आणि 2.3 मीटर सायकल मार्ग असलेला रस्ता हा 3+3 मार्गीका ( ९.७ मी + ९.७ मी) असा असणार आहे. - सध्या बीकेसी अंतर्गत रस्ता 2+2 मार्गीका (७ मी+७ मी) आणि १.५ मीटर सायकल मार्ग असलेला रस्ता हा 3+3 मार्गीका ( ८.५ मी + ८.५ मी) असा असणार आहे. - सध्या बीकेसी अंतर्गत रस्ता १+१ मार्गीका (३.५ मी+३.५ मी) आणि १.५मीटर सायकल मार्ग असलेला रस्ता हा 3+3 मार्गीका ( ५.०मी + ५.० मी) असा असणार आहे

## गायन क्षेत्रातील उगवती तेजस्वी चांदणी ईश्वरी लोहोटे,कला भूषण पुरस्काराने सन्मानित...!

महाराष्ट्र जीत

**मुंबई(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)**




बालवयातच कलात्मक धोरण अवलंबुन नृत्य,सामाजिक बांधिलकी,गायन तसेच सांस्कृतिक क्षेत्रात आपले नाव उज्वल करणारी मुलगी म्हणजे ईश्वरी लोहोटे. कलागुण संपन्न,गोड गळ्याची गायिका,सामाजिक क्षेत्रात अग्रेसर, नृत्य, शिक्षणात हुशार विविध क्षेत्रात आपल्या गुरुजनांचे व आईवडीलांचे नाव अजरामर करणारी इयत्ता सातवी मध्ये शिकणारी मुलगी ईश्वरी लोहोटे. तीच्या या चतुरस्त्र कामगिरीची दखल मुंबईच्या आर्यारवी एंटरटेन्टमेन्ट या संस्थेने घेतली. नुकताच शिशुविकास हॉल,राजकमल स्टुडिओ,परेल येथे आर्यारवी एंटरटेन्टमेन्टने आयोजित केलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव व पुरस्कार वितरण सोहळ्यात ईश्वर लोहोटे हिला"कला भूषण" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार प्रसिद्ध सिने-नाट्य अभिनेते जयराज नायर, प्रसिद्ध सिने नाट्य अभिनेते, दिग्दर्शक प्रदीप कबरे, जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, समाजसेविका सीमाताई पाटील, ग्राफीक डिझायनर मनिष व्हटकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. ईश्वरी लोहोटे हिने गायन क्षेत्रातील विविध टप्यातील परीक्षा देऊन प्राविण्य मिळविलेले आहे. नाट्य,सामाजिक क्षेत्र, नृत्य, गायन, शिक्षण या क्षेत्रात उत्तम कार्य केल्याबद्दल विविध क्षेत्रातील सामाजिक संस्थांचे पुरस्कार, सन्मानपत्र, प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.तसेच प्रसिद्ध सिने-नाट्य, लेखक-दिग्दर्शक वामन केंद्रे यांच्या कार्यशाळेत शिक्षण घेत आहे.ईश्वरी लोहोटे हिला"कला भूषण"पुरस्कार मिळाल्याबद्दल तीचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.